सकाळ




कोल्हापूर : अहिल्याबाई होळकर जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात अभिवादन झाले.

# शिवाजी विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती आज शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरी झाली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या उपस्थितीत अभिवादन झाले. फगवाडा (पंजाब) येथील लव्हली प्रोफेशनल विद्यापीठाचे अधिष्ठाता प्रा. सौरभ लखनपाल, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. एम. एस. देशमुख, समाजशास्त्र अधिविभागप्रमुख तथा सामाजिक वंचितता व समावेशन केंद्राचे संचालक डॉ. जगन कराडे, डॉ. एम. टी. गोफणे, डॉ. किशोर खिलारे आदी उपस्थित होते.

पुढारी

# अहिल्यादेवी होळकर यांना शिवाजी विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी फगवाडा (पंजाब) येथील लव्हली प्रोफेशनल विद्यापीठाचे अधिष्ठाता प्रा. सौरभ लखनपाल, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत आदी उपस्थित होते.

0 1 JUN 2022

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

गौरव समारंभात पंजाबच्या विद्यार्थ्यांची भावपूर्ण प्रतिक्रिया

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुरी पाहुणचाराच्या प्रेमात पडलो

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा हिरवागार निसर्गरम्य परिसर आणि कोल्हापुरी पाहुणचार यांच्या आम्ही प्रेमात पडलो आहोत, अशी भावनिक प्रतिक्रिया पंजाबच्या विद्यार्थ्यांनी मंगळवारी येथे व्यक्त केली.

'आजादी का अमृतमहोत्सव' आणि शिवाजी विद्यापीठाचा हीरकमहोत्सव यानिमित्ताने 'महाराष्ट्र के रंग, पंजाब के संग, या सांस्कृतिक उपक्रमाच्या सांगता गौरव समारंभात पंजाबच्या लव्हली प्रोफेशनल विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी ही भावना व्यक्त केली.

पंजाबचा विद्यार्थी नमनसिंह म्हणाला, आम्हाला आमच्या लव्हली विद्यापीठाचा परिसर फार मोठा वाटत होता. मात्र, विद्यापीठाचा परिसर कसा असावा, ते शिवाजी विद्यापीठात आल्यानंतर लक्षात आले.

शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थी सुमंत कुलकर्णी म्हणाला, या उपक्रमातून पंजाबसोबत मैत्रभावाचे नाते दृढ झाले. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, लव्हली विद्यापीठाचे अधिष्ठाता प्रा. सौरभ लखनपाल, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव आणि व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. योजना जुगळे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना स्मृतिचिन्ह, प्रशस्तिपत्रे देऊन गौरवण्यात आले.

शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थी केवल यादव याने छत्रपती शिवाजी महाराज यांचे अवघे ४X५ मि.मी. आकाराचे पेंटिंग केले आहे. त्यासाठी त्याचे नाव 'आशिया बुक ऑफ रेकॉर्ड'मध्ये आले आहे. त्याच्या या यशाबद्दल कुलगुरू शिर्के यांच्या हस्ते त्याचा गौरव करण्यात आला. मुंबई विद्यापीठाचे तज्ज्ञ मार्गदर्शक डॉ. नीलेश सावे आणि डॉ. आर. व्ही. गुरव यांनी या उपक्रमासाठी परिश्रम घेतले.




शिवाजी विद्यापीठात आयोजित 'महाराष्ट्र के रंग, पंजाब के संग' या सांस्कृतिक उपक्रमाच्या सांगता समारंभात विद्यार्थ्यांनी चित्तथरारक कला सादर केल्या.

## 'पारितोषिकाच्या रकमेचे समान वाटप'

लव्हली प्रोफेशनल विद्यापीठाच्या कुलपतींनी शिवाजी विद्यापीठ संघास जे एक लाख रुपयांचे पारितोषिक दिले होते, त्यामध्ये आणखी भर घालून त्या रकमेचे संघातील सर्व विद्यार्थ्यांना समान वाटप करण्यात येणार असल्याची माहिती विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी यावेळी दिली. विद्यापीठाच्यावतीने या कार्यक्रमाचे उत्तम पद्धतीने नियोजन करण्यात आले होते. त्यामुळे पाहुणे भारावून गेले होते.

जनसंपर्क कक्ष
01 JUN 2022 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ परिसर, कोल्हापुरी पाहुणचाराच्या प्रेमात पडलो

## गौरव समारंभात पंजाबच्या विद्यार्थ्यांची प्रतिक्रिया

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचा हिरवागार निसर्गरम्य परिसर व कोल्हापुरी पाहुणचार यांच्या आम्ही प्रेमात पडलो आहोत, अशी भावनिक प्रतिक्रिया पंजाबच्या विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.



**कोल्हापूर : पंजाबच्या लव्हली प्रोफेशनल विद्यापीठाच्या संघाचा छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची प्रतिकृती भेट देऊन गौरव करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.**

आजादी का अमृत महोत्सव आणि शिवाजी विद्यापीठाचा हीरक महोत्सव यानिमित्ताने 'महाराष्ट्र के रंग, पंजाब के संग' या सांस्कृतिक आदान-प्रदान उपक्रमांतर्गत गौरव समारंभ झाला. शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात दोन दिवस सुरू असलेल्या सांस्कृतिक उपक्रमाचा मंगळवारी समारोप झाला.

पंजाबचा विद्यार्थी नमनसिंह याने प्रातिनिधिक भावना व्यक्त केल्या. लव्हली विद्यापीठाचा परिसर मोठा वाटत होता. मात्र विद्यापीठ परिसर कसा असावा, ते शिवाजी विद्यापीठात आल्यानंतर लक्षात आले. इथला परिसर निसर्गसंपन्न व जैवविविधतेने समृद्ध आहे. कोल्हापुरी पाहुणचार हीसुद्धा प्रेमात पाडणारी गोष्ट आहे. कोल्हापूरशी कायमस्वरूपी स्नेहबंध निर्माण झाला आहे. शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थी सुमंत कुलकर्णी याने सांस्कृतिक आदान-प्रदान उपक्रमातून पंजाबसोबत मैत्र भावाचे नाते दृढ झाल्याची भावना व्यक्त केली.

यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, लव्हली विद्यापीठाचे अधिष्ठाता प्रा. सौरभ लखनपाल, डॉ. आर. व्ही. गुरव आणि डॉ. योजना जुगळे यांच्या हस्ते लव्हली प्रोफेशनल विद्यापीठ व शिवाजी विद्यापीठ संघांतील विद्यार्थ्यांना स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्रे देऊन गौरविण्यात आले. कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते प्रा. लखनपाल यांना छत्रपती शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्याची प्रतिकृती देऊन सन्मानित करण्यात आले.

### ध्यानधारणेचे दृश्य पाहून समाधान

पंजाबच्या विद्यार्थ्यांनी मंगळवारी सकाळी संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या तलाव परिसरात ध्यानधारणा करून परिसराचा आनंद घेतला. फिरत असताना हे ध्यानधारणेचे हे दृश्य पाहून अतिशय समाधान वाटले, असे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले. विद्यापीठाचा परिसर ध्यानधारणा व ज्ञानसाधना या दोहोंसाठी उपयुक्त आहे, असेही ते म्हणाले.

0 1 JUN 2022 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महाराष्ट्राची लोकधारा, दिवळी नृत्याने जिंकली मने

## 'महाराष्ट्र के रंग, पंजाब के संग' उपक्रमाचा समारोप

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थिनींनी सादर केलेले गोव्याचे दिवळी नृत्य (दीपनृत्य) व महाराष्ट्राच्या पारंपरिक लोकधारेच्या सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. महाराष्ट्राची लावणी व पंजाबी भांगडा नृत्याने कार्यक्रमास उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात जल्लोषी प्रतिसाद दिला.

विद्यापीठातील राजमाता जिजाऊ बहुउद्देशीय सभागृहात मंगळवारी सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात 'दिवळी' पारंपरिक लोकनृत्याने झाली. अत्यंत अवघड असा हा नृत्यप्रकार या विद्यार्थिनींनी अत्यंत नजाकतीने सादर केला. त्यानंतर विद्यार्थ्यांनी 'आझादी' हे प्रहसन (लघुनाटिका) सादर केले.



**कोल्हापूर : 'महाराष्ट्र के रंग, पंजाब के संग' उपक्रमांतर्गत कार्यक्रमात दिवळी नृत्य सादर करताना शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थिनी. (छाया : पप्पू अत्तार)**

त्यानंतर लव्हली प्रोफेशनल विद्यापीठाने भारतीय वाद्यवृंद सादर केला. यातून महाराष्ट्र व पंजाबसह ईशान्य भारत, पश्चिम बंगाल, आसाम, राजस्थान, गुजरात, ओडिशा आदी राज्यांतील लोकसंगीताच्या विविध छटांचे दर्शन घडवले. 'महाराष्ट्राची लोकधारा' अंतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या संघाने भूपाळीपासून ते वासुदेव नृत्य, शेतकरी नृत्य, कोकणचे बाल्या नृत्य, मंगळागौर, भारूड, धनगरी नृत्य, वाघ्या-मुरळी, जोगवा, गोंधळ, कोळीनृत्य अशा महाराष्ट्राच्या समृद्ध लोकपरंपरांचे दर्शन घडवले. पंजाबच्या संघाने शहीद भगतसिंगांच्या जीवन संदेशावर आधारित एकांकिका सादर केली. प्रतीक सिंह व गणेश चिंचकर यांनी अप्रतिम नक्कल सादर केली. सांस्कृतिक आदान-प्रदान उपक्रमाचा लावणी व भांगडा या नृत्यांनी प्रचंड जल्लोषी प्रतिसादाने समारोप झाला. डॉ. नीलेश सावे आणि हितेंद्र सिंग यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

01 JUN 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापुरी पाहुणचाराच्या प्रेमात पडलो

## पंजाबच्या विद्यार्थ्यांची प्रतिक्रिया : शिवाजी विद्यापीठातील कार्यक्रमाची सांगता

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचा हिरवागार निसर्गरम्य परिसर आणि कोल्हापुरी पाहुणचार यांच्या आम्ही प्रेमात पडलो आहोत, अशी अत्यंत भावनिक प्रतिक्रिया पंजाबच्या विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. आजादी का अमृतमहोत्सव आणि शिवाजी विद्यापीठाचा हीरकमहोत्सव यानिमित्ताने 'महाराष्ट्र के रंग पंजाब के संग' या सांस्कृतिक आदान-प्रदान उपक्रमाच्या गौरव समारंभात पंजाबच्या लव्हली प्रोफेशनल विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी ही भावना व्यक्त केली. शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात दोन दिवस सुरू असलेल्या या सांस्कृतिक उपक्रमाचा मंगळवारी समारोप झाला.




**कोल्हापूर : पंजाबच्या लव्हली प्रोफेशनल विद्यापीठाच्या संघाचा छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची प्रतिकृती भेट देऊन गौरव करताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.**

पंजाबचा विद्यार्थी नमनसिंह याने प्रातिनिधिक भावना व्यक्त केल्या. 'आम्हाला आमच्या लव्हली विद्यापीठाचा परिसर फार मोठा वाटत होता; मात्र विद्यापीठाचा परिसर कसा असावा, ते शिवाजी विद्यापीठात आल्यानंतर लक्षात आले. इथला परिसर अत्यंत निसर्गसंपन्न व जैवविविधतेने समृद्ध आहे. तो अत्यंत भुरळ पाडणारा आहे.'

शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थी सुमंत कुलकर्णी यानेही या सांस्कृतिक आदान-प्रदान उपक्रमातून पंजाबसोबत मैत्रभावाचे नाते दृढ झाल्याची भावना व्यक्त केली.

यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, लव्हली विद्यापीठाचे अधिष्ठाता प्रा. सौरभ लखनपाल, डॉ. आर. व्ही. गुरव आणि व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. योजना जुगळे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना स्मृतिचिन्ह, प्रशस्तिपत्रे देऊन गौरविण्यात आले. कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते प्रा. लखनपाल यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याची प्रतिकृती प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थी केवल यादव याने छत्रपती शिवाजी महाराज यांचे अवघे ४५ मि.मी. आकाराचे अत्यंत लहान पेंटिंग केले आहे. त्यासाठी त्याचे नाव 'आशिया बुक ऑफ रेकॉर्ड'मध्ये आले आहे. त्याच्या या यशाबद्दल कुलगुरू शिर्के यांच्या हस्ते त्याचा गौरव करण्यात आला.

0 1 JUN 2022
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मराठी-पंजाबी संस्कृतीचा मिलाफ

## शिवाजी विद्यापीठातील सांस्कृतिक कार्यक्रमाचा समारोप

कोल्हापूर, ता. ३१ : मराठी संस्कृतीचे विविध पैलू दर्शवणारी लोकनृत्ये. पंजाबच्या मातीतील कलासक्तपणा दाखवणारे विविध लोककलांचे प्रकार.


अशा रंजनात्मक सादरीकरणातून आज कलामंचावर मराठी-पंजाबी संस्कृतीचा मिलाफ पाहायला मिळाला. शिवाजी विद्यापीठाच्या जिजामाता सभागृहात सुरू असणारा 'महाराष्ट्र के रंग पंजाब के संग' या सांस्कृतिक उपक्रमाचा समारोप झाला.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील 'महाराष्ट्र के रंग पंजाब के संग' या कार्यक्रमातील लोककला दाखवणारे नृत्य.**

आजच्या सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरवात 'दिवळी' या गोव्याच्या पारंपरिक लोकनृत्याने झाली. शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थिनींनी ते सादर केले. अवघड असा हा नृत्यप्रकार या विद्यार्थिनींनी नजाकतीने सादर केला. शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी 'आझादी' हे प्रहसन (लघुनाटिका) सादर केले. स्वातंत्र्याचा अर्थ आणि महत्त्व त्यांनी याद्वारे अधोरेखित केले. त्यानंतर लव्हली प्रोफेशनल विद्यापीठाने भारतीय वाद्यवृंद सादर केला. या माध्यमातून त्यांनी महाराष्ट्र व पंजाबसह ईशान्य भारत, पश्चिम बंगाल, आसाम, राजस्थान, गुजरात, ओडिशा आदी राज्यांतील लोकसंगीताच्या विविध छटांचे दर्शन घडविले. 'महाराष्ट्राची लोकधारा' याअंतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या संघाने भूपाळीपासून ते वासुदेव नृत्य, शेतकरी नृत्य, कोकणचे बाल्या नृत्य, मंगळागौर, भारूड, धनगरी नृत्य, वाघ्या-मुरळी, जोगवा, गोंधळ, कोळीनृत्य अशा महाराष्ट्राच्या समृद्ध लोकपरंपरांचे दर्शन घडविले आणि दर्शकांची मने जिंकली. पंजाबच्या संघाने शहीद भगतसिंगांच्या जीवन संदेशावर आधारित एकांकिका सादर केली. प्रतीक सिंह आणि गणेश चिंचकर यांनी नक्कल सादर केली. पंजाब व कोल्हापूरच्या विद्यापीठांनी संयुक्तपणे देशभक्तीक्तिपर गीतांचा कार्यक्रम सादर केला. अखेरच्या टप्प्यात या सांस्कृतिक आदानप्रदान उपक्रमाचा कळसाध्याय रचला, तो लावणी व भांगडा या नृत्यांनी. डॉ. नीलेश सावे आणि हितेंद्र सिंग यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

तरुण भारत



कोल्हापूर : गोखले कॉलेजमधील व्याख्यानाच्या उद्घाटनप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. मंजिरी देसाई, डॉ. पी. के. पाटील, एस. एच. पिसाळ.

# 'नवीन शैक्षणिक धोरणाची लवकरच अंमलबजावणी'

कोल्हापूर :विद्यार्थ्यांचा सर्वांगीण हित आणि त्यांच्या आवडी-निवडी लक्षात घेवून नवीन शैक्षणिक धोरण तयार केले आहे. या विद्यार्थीभिमुख नवीन शैक्षणिक धोरणाची लवकरच अंमलबजावणी होणार आहे, असे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले. गोखले कॉलेजमधील आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. पी. के. पाटील होते. प्र-कुलगुरु डॉ. पाटील यांनी  नवीन शैक्षणिक धोरण कशा पध्दतीने कौशल्यावर आधारीत असून, रोजगाराभिमुख असल्याचे सांगितले. तसेच पुर्वीची व सध्याची शिक्षण पध्दती आणि नवीन शैक्षणिक धोरणात बदल होणाऱ्या शिक्षण पध्दतीसंदर्भात मार्गदर्शन केले. शिक्षण प्रसारक मंडळाच्या प्रशासन अधिकारी डॉ. मंजिरी मोरे यांनी प्रास्ताविक केले. शिक्षण प्रसारक मंडळाचे सेक्रेटरी जयकुमार देसाई यांच्या हस्ते पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. प्रा. पी. बी. झावरे यांनी ओळख करून दिली. डॉ. आर. बी. भुयेकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. इस. आर. घाटगे यांनी आभार मानले. यावेळी मंडळाचे पेट्रन कौन्सिल मेंबरचे दौलत देसाई, उपप्राचार्य एस. इच. पिसाळ, प्रा. ए. एम. गाईगडे, प्रा. डी. के. नरळे आदी उपस्थित होते.